प्रेस नोट दिनांक २३/०५/२०२६

**मुंबई शहरात परराज्यातुन विदेशी बनावटीचे बेकायदेशीर अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे विक्री करण्यासाठी आलेल्या इसमाना गुन्हे शाखा, मुंबई यांनी जेरबंद केलेबाबत.**

खंडणी विरोधी कक्ष, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथे गोपनिय सुत्राकडून माहिती प्राप्त झाली की, काही इसम विनापरवाना अग्नी शस्त्र बाळगुन ते विक्री करण्याच्या तयारीनीशी दिनांक २२/०५/२०२६ रोजी रात्रौ २२:४५ वा. सुमारास सेंट जॉर्ज हॉस्पीटल जवळ, पी.डी.मेलो रोड, सार्वजनिक शौचालयाच्या जवळ, ईस्टन फ्रि वे कडे जाणाऱ्या रस्त्यावर, उत्तर वाहीणी सी.एस. एम.टी., मुंबई येथे येणार आहेत. खंडणी विरोधी पथक येथील अधिकारी व अंमलदार यांनी नमुद ठिकाणी सापळा रचुन ०३ इसमांना त्यांच्या ताब्यातील ०३ विदेशी बनावटीचे पिस्टल, मॅगझीनसह आणि एकुण ४५ जिवंत काडतुसे इत्यादी मालमत्तेसह रंगेहात पकडण्यात आले. नमुद इसमांनी त्यांचे कब्जात अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे बेकायदेशीरपणे विनापरवाना विक्री करीता जवळ बाळगले. तसेच त्यांनी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे हत्यारबंदी आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन मा.र.आ. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई या ठिकाणी गुन्हा दाखल करण्यात येवून गुन्हयाचा पुढील तपास खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्फत करण्यात येत आहे.

अटक करण्यात आलेल्या इसमांची नावे १) पुरुष, वय २४ वर्षे, २) पुरुष, वय ३४ वर्षे, ३) पुरुष, वय २४ वर्षे, अशी आहेत. सदर इसमापैकी आरोपी क्र. १ व ३ हे सन २०२२ पासुन खुनाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारे खंडणी विरोधी पथकाने मुंबई शहरात परराज्यातुन अवैद्यरित्या बेकायदेशीर अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या व विक्री करण्याकरिता आलेल्या इसमांविरुध्द कारवाई करून कौशल्यपुर्ण कामगिरी केली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी (विशेष) श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील प्र.पो.नि. घनश्याम नायर, पो.नि. सुनिल पवार, स.पो.नि. विशाल मोहिते, रूपेश पाटील, पोह. विजय शेंदरकर, विपीन निकम, महेश मुळे, प्रमोद शिर्के, कैलास चौगुले, अमोल तोडकर, संदीप पाटील, पोशि. कैलास जाधव, किरण बनसोडे, किरण सोनकांबळे, पोहचा.साई कदम, पोशिचा. जगदीश कोळी, जमील शेख व विशेष कार्य पथकातील पोह. अमित चौधरी, अतिश थोरात, पोशि. संतोष वायाळ, उत्कृष्ट कदम, निरंक कुटे, प्रथमेश उतेकर व पोशिचा. संतोष बेरड यांनी पार पाडलेली आहे.

......................

Scanned with CamScanner